प्रकल्प प्रवर्तक मेसर्स अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना मर्यादित, मुक्काम पोस्ट- शाहूनगर, शेंद्रे, तालुका व जिल्हा - सातारा, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित क्षमता विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता विस्तार २,५००.० टन प्रतिदिन ते ४,८००.० टन प्रतिदिन पर्यंत, आसावणी प्रकल्प क्षमता ३०.० किलोलिटर प्रतिदिन ते ४५.० किलोलिटर/दिन पर्यंत (रेक्टीफाईड स्पिरिट/इ.एन.ए./इथेनॉल), सी/बी हेवी मोलॅसिस/उसाचा रस (शुगरकेन ज्युसवर) आधारित आसवणी प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना मर्यादित, मुक्काम पोस्ट- शाहूनगर, शेंद्रे, तालुका व जिल्हा - सातारा, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित क्षमता विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता विस्तार २,५००.० टन प्रतिदिन ते ४,८००.० टन प्रतिदिन पर्यंत, आसावणी प्रकल्प क्षमता ३०.० किलोलिटर प्रतिदिन ते ४५.० किलोलिटर/दिन पर्यंत (रेक्टीफाईड स्पिरिट/इ.एन.ए./इथेनॉल), सी/बी हेवी मोलॅसिस/उसाचा रस (शुगरकेन ज्युसवर) आधारित आसवणी प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी वार- मंगळवार, दिनांक १० ऑगस्ट, २०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ५१/२०२१ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी- २१०८०३-एफटीएस-

००३३ दिनांक ०३-०८-२०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, सातारा - अध्यक्ष
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) प्रादेशिक अधिकारी, - सदस्य
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी, - आयोजक
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सातारा

श्री एल. एस. भड, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सातारा तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीमुळे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांनुसार ही प्रत्यक्ष जनसुनावणी (Physical Public Hearing) आयोजित करण्यात आलेली असून बैठकीच्या सत्रात १०० व्यक्तींना परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास उरलेल्या व्यक्तींनाही पुढील सत्राच्या

बैठकीत संधी देण्यात येईल. सर्व उपस्थितांना जनसुनावणीत सहभागाची संधि देण्यात येईल असे त्यांनी सांगितले. आयोजक यांनी उपस्थितांना कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना केली. त्यानुसार, प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे, सॅनिटायझरचा वापर हे सभागृहात प्रवेश करताना प्रवेशव्दाराजवळ करण्यात आलेला आहे. बैठकीत प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना त्यांनी केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री सुनील थोरवे, अपर जिल्हादंडाधिकारी, सातारा तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री नितीन शिंदे, प्रभारी प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरणाक्षेत्रात कार्यरत संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री भड यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना प्रकल्प प्रवर्तक मेसर्स अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना मर्यादित, मुक्काम पोस्ट-शाहूनगर, शेंद्रे, तालुका व जिल्हा - सातारा, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित क्षमता

विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता विस्तार २,५००.० टन प्रतिदिन ते ४,८००.० टन प्रतिदिन पर्यंत, आसावणी प्रकल्प क्षमता ३०.० किलोलिटर प्रतिदिन ते ४५.० किलोलिटर/दिन पर्यंत (रेक्टीफाईड स्पिरिट/इ.एन.ए./इथेनॉल), सी/बी हेवी मोलॅसिस/उसाचा रस (शुगरकेन ज्युसवर) आधारित आसवणी प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून प्रकल्प पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार संवर्ग "ब" ५ (जी) मध्ये मोडत असल्याने प्रकल्पास महाराष्ट्र शासनाची पर्यावरण अनुमती प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातील राज्य पर्यावरण मुल्यांकन तज्ज्ञ समितीस (State Environment Appraisal Committee - SEAC) पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (Environment Impact Assessment - EIA) तयार करण्याची परवानगी मागितली व सदरहू विभागाने दिनांक रोजी दिनांक २५ फेब्रुवारी, २०२१ रोजी त्यास मान्यता (अटी व शर्ती - Terms of Reference) दिली.

आयोजक यांनी पुढे सांगितले की मा. जिल्हाधिकारी, सातारा यांच्या मान्यतेने सदरहू जनसुनावणी ही आज वार - मंगळवार दिनांक १०-०८-२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आलेली आहे. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचनेनुसार जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर स्थानिक आणि राष्ट्रीय वृत्तपत्रात स्थानिक जनतेच्या माहितीसाठी जाहिर सूचना प्रकाशित करणे बंधनकारक आहे. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ सातारा यांच्यातर्फे स्थानिक वृत्तपत्र पुढारी यात स्थानिक भाषा मराठीत आणि राष्ट्रीय वृत्तपत्र दैनिक इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक ०९ जुलै, २०२१ रोजी जनसुनावणीबाबत जाहिर सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती. त्यात जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याचप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण आघात मुल्यांकन व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर, मा. जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा, मा. जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सातारा, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, तहसीलदार, तहसील कार्यालय- सातारा, जिल्हा - सातारा, ग्रामपंचायत, कार्यालय-, शेंद्रे, तालुका व जिल्हा - सातारा, प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक

कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, उप प्रादेशिक अधिकारी, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा आणि म.प्र.नि. मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात. श्री भड यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पास एकूण ६७.३० कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असून प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण व्यवस्थापन योजनांसाठी दरवर्षी १,१३० लाख रुपये खर्च करण्यात येईल. प्रकल्पातील सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही. विस्तारिकरणामुळे प्रकल्पात अतिरिक्त ५० व्यक्तींना रोजगाराची संधि मिळू शकते. मात्र, परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल.

सादरीकरणानंतर पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांच्या काही आक्षेप, सूचना नोंदविण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) <u>श्री सदाशिव महादेव गायकवाड, राहणार-मुक्काम पोस्ट-शेंद्रे, तालुका, जिल्हा-सातारा:-</u>

प्रकल्प प्रवर्तकांनी ऊस गाळप क्षमता विस्तारिकरणचा निर्णय घेतलेला आहे. ऊस गाळप विस्तारिकरणामुळे सांडपाण्याच्या निर्मितीमध्येही वाढ होणार आहे. तरी प्रक्रिया केलेले सांडपाणी जर शेतक-यांना उपलब्ध करुन देण्यात आले, तर शेतक-यांनाही जास्त प्रमाणात ऊस लागवड करता येऊ शकेल. त्यामुळे शेतक-यांची आर्थिक परिस्थिती सुधारेल. तरी शेतक-यांना प्रक्रिया केलेले अतिरिक्त सांडपाणी उपलब्ध करून देण्यात यावे.

२) <u>श्री संतोष अंकुश पोतेकर, राहणार-मुक्काम पोस्ट-शेंद्रे, तालुका, जिल्हा-सातारा:-</u>

प्रकल्प विस्तारिकरणामुळे प्रकल्प उत्पादनासाठी जादा पाणी लागेल. त्याचप्रमाणे उत्पादन प्रकियेमुळे जादा सांडपाणी निर्मिती होणार आहे. तरी अतिरिक्त जादा पाण्याची विल्हेवाट कशी लावण्यात येईल?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ऊसगाळप क्षमता वाढविल्यामुळे जे जादा सांडपाणी निर्माण होईल, त्यावर प्रक्रिया करुन त्याचा आसवणी प्रकल्पात पुनर्वापर करण्यात येणार आहे.

३) <u>श्री चंद्रकांत विश्वास जाधव, राहणार-मुक्काम पोस्ट-शेंद्रे, तालुका, जिल्हा-सातारा:-</u>

प्रकल्प प्रवर्तकांनी ऊस गाळप क्षमता आणि आसवणी उत्पादन क्षमता विस्तारिकरण योजलेले आहे. ते अभिनंदनीय आहे. त्यास स्थानिकांचा पाठिंबा आहे. मात्र उत्पादन विस्तारिकरणासाठी जादा पाणी लागेल, त्याचप्रमाणे सांडपाण्याच्या निर्मितीतही वाढ होईल. तरी उत्पन्न होऊन सोडणा-या सांडपाण्याची शुध्दता वाढविण्यात यावी.

४) श्री सोपान शिवाजी भोसले, राहणार-मुक्काम पोस्ट-शेंद्रे, तालुका, जिल्हा-सातारा:-

ऊस गाळप क्षमता विस्तारिकरण आणि आसवणी विस्तारिकरणामुळे येथील स्थानिक शेतक-यांचा आर्थिक फायदा होईल. तरी स्थानिकांचा सदरहू विस्तारिकरण प्रकल्पास पाठिंबा आहे.

ग्रामपंचायत शेंद्रे,ता. जि.सातारा यांचे नाहरकत प्रमाणपत्र घेण्यात आलेले आहे.

५) श्री भानुदास चौरे, ऊस उत्पादक सभासद, राहणार-मुक्काम पोस्ट-शेंद्रे, तालुका, जिल्हा-सातारा:-

प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्प विस्तारिकरण करण्याचे ठरविलेले आहे. तरी सर्व नियम पाळण्यात यावे व नियमांचे उल्लंघन करण्यात येऊ नये. प्रकल्प विस्तारिकरणास आमचा पाठिंबा आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की उप प्रादेशिक कार्यालय, सातारा यांना अध्यक्ष, रुरल एन्व्हॉयरमेंट एज्युकेशन एन्ड हेल्थ अवरनेस सोसायटी, हैद्राबाद यांच्याकडून प्रकल्पास

पाठिंबा देताना काही सूचना ईमेलव्दारे प्राप्त झालेल्या आहेत. तरी संबंधित सूचना पत्र जनसुनावणी इतिवृतान्त, अंतिम पर्यावरण अहवालासोबत शासनास पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल. त्यांनी पुढे सांगितले की आता बैठकीत अध्यक्ष, एन्व्हॉरमेंटल पोल्युशन कंट्रोल अवेअरनेस सोसायटी, हैद्राबाद आणि मानव वनरुला आणि विकालांगुला संकेशाम संगम, सरुर नगर यांच्याकडून प्रकल्पास पाठिंबा देताना काही सूचना प्राप्त झालेल्या आहेत. सदरहू सूचना पत्रे ही जनसुनावणी इतिवृतान्त आणि अंतिम पर्यावरण अहवालासोबत शासनास पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल.

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रकल्पाच्या प्रस्तावित विस्तारिकरणाबाबत काही सूचना, प्रश्न विचारण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताही प्रतिसाद नव्हता. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीने आयोजकांना बैठकीचा समारोप करण्याची सूचना केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा ऊहापोह करताना सांगितले की आज आपण प्रकल्प प्रवर्तक प्रकल्प प्रवर्तक मेसर्स अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना मर्यादित, मुक्काम पोस्ट- शाहूनगर, शेंद्रे, तालुका व जिल्हा - सातारा, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित क्षमता विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता विस्तार २,५००.० टन प्रतिदिन ते ४,८००.० टन प्रतिदिन पर्यंत, आसावणी प्रकल्प क्षमता ३०.० किलोलिटर प्रतिदिन ते ४५.० किलोलिटर/दिन पर्यंत (रेक्टीफाईड स्पिरिट/इ.एन.ए./इथेनॉल), सी/बी हेवी मोलॅसिस/उसाचा रस (शुगरकेन ज्युसवर) आधारित आसवणी प्रकल्पाच्या

पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी उपस्थित होतो. अतिशय चांगले मुद्दे उपस्थितांकडून सांगण्यात आले. येथे काही निवेदने आलेली आहेत. त्याची नोंद घेण्यात येऊन बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई येथील तज्ज्ञ समितीस सादर करण्यात येतील. तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल. त्यांनी सर्वांचे आभार मानून जनसुनावणी ही संपन्न झाल्याचे जाहिर केले

अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात. आली.

सोबत प्राप्त झालेल्या ०४ सूचना जोडण्यात येत आहेत.

(एल.एस. भड),
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, सातारा

(नितीन शिंदे),
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, पुणे

(सुनील थोरवे),
अध्यक्ष
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, सातारा
जिल्हा- सातारा